# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५५७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—०२/०९/२०१६

**१) पिशवीतील डॅमेज हॅडसेट स्पेयरपार्टची चोरी . :—**

दिनांक ३१/०८/२०१६ रोजी १६.३० वा. दर. यातील फिर्यादी चेतन एकनाथ रामटेके वय ३५ वर्ष, रा. वैशाली नगर खात रोड भंडारा हा बिटीडीसी कुरीयर कंपनीतील ३ डॅमेज हॅडसेटचे स्पेयरपार्ट सामान उचलुन ग्राहकांना वाटप करण्या करीता सायकलने निघाला व सेन्ट्रल बॅक ऑफ इंडीया शाखा भंडारा मोठा बाजार येथे सायकल ऊभी करुन कुरीयर पार्सल बॅकेत देण्या करीता गेला आणि पार्सल देवुन सायकल जवळ आला असता ३ डॅमेज हॅडसेटचे स्पेयरपार्ट कि. ११,८५७ /—रु. चा माल दोन्ही पिशव्या मधील सामान पिशवीसह कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाडे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) इंलेक्ट्रानीक दुकानातील सिक्केची चोरी . :—**

दिनांक ०१/०९/२०१६ रोजी ००.३० वा ते ०१.१५ वा. दर. यातील फिर्यादी विवके रमेश गुप्ता वय ४४ वर्ष, यांचे दुकानाचे मागील भागाचे खिडकीचे लोखंडी ग्रिल वाकवुन कोणीतरी अज्ञात चोराने आत प्रवेश करुन काऊटंरचे ड्राप मध्ये ठेवलेले २५/—रु. चे चिल्लर सिक्के अंदाजे १०,०००/—रु. चे गोपाळ कृष्ण इंलेक्ट्रॉनीक येथुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) जादु टोनाच्या कारणावरुन मारहान करुन जखमी केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ३१/०८/२०१६ रोजी २०.१५ वा. दर. यातील फिर्यादी ही पती मुलगा, व सुन असे घरी हजर असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीच्या अंगणात जावुन फिर्यादीचा पती धनसिंग बडोले व किशोर तिरपुडे यांचे नाव घेवुन दोघांनीही मिळुन माझे वडीलावर जादु केली असे बोलुन भांडण शिवीगाळ करुन फिर्यादीचा मुलगा अतुल यास अंगणातुन ओढतांन करुन ढकलढुकल करीत असता फिर्यादीची सुन आळवी झाल्यावर आरोपी क्र. १ ने डोक्याचे केस पकडुन ओढतांन केली ते पाहुण फिर्यादीचा मुलगा हा आळवा झाल्याने आरोपी क्र. २ हा हातात काठी घेवुन मारण्यास धावला असता फिर्यादीने हात आडवा केल्याने तीचे डावे हाताचे व मधल्या बोटावर मार लागुन दुखत असल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४४७,५०४,५०६,३२३,३४ भांदवि. सहकलम ३ महाराष्ट्र जादु टोना प्रतीबंधक अधी. २०१३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**४) बोलेरो पिकअप दोन्ही गाडी चालकांना थापडबुक्यांनी मारपीट केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ३१/०८/२०१६ रोजी २१.०० वा. दर. यातील फिर्यादी महादेव लहु राऊत वय ४२ वर्ष, रा. जांभळी हा आपल्या ताब्यातील बोलेरो पिकअप गाडी क्र. एमएच ३६ एफ ३१८० मध्ये शेळया/बक—या भरुन नागपुर कडे जात असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीच्या वाहनास अडवुन त्यास समोर जाण्यास अडथळा निर्माण केला त्यानंतर आलेल्या बोलेरो पिकअप क्र. एमएच ३५ के. ४७०४ हीला ही थांबवुन समोर जाण्यास अडथळा निर्माण करुन दोन्ही वाहणाच्या चालकांना थापडबुक्यांनी मारपिट केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३४१,३२३,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत

५) विवाहीतेस पैश्यासाठी मानसीक व शारीरीक छळ केल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक ०३/०५/२०१३ ते आज पावेतो यातील फिर्यादीचे लग्न झाल्या नंतर ती पती सोबत त्यांचे गावी राहत असतांना यातील आरोपीने फिर्यादीस लोनचे पैसे परतफेड करण्यासाठी २,००,०००/–रु. आपल्या आई कडुन घेवुन ये पैसे दिले नाही म्हणुन फिर्यादीस मानसीक व शारीरीक त्रास देवुन छळ करुन दुस–या मुलीसोबत साक्षगंधाचा कार्यक्रम करुन लग्न करण्याचे ठरविल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४९८(अ),४९४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कांबळे पो. स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत

६) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–

दिनांक ०१/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, गोबरवाही, लाखनी, लाखांदुर, दिघोरी, व पालांदुर येथील अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण १० गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४६ लिटर हातभंट्टी दारु कि. ५,९००/–रू. व देशी दारू ८४ लिटर ६४० मिली देशी दारू कि. १२,४००/–रु. तसेच जुगारातुन १,२१५/–रू. असा एकुण कि. १९,५३५/–रू. चा माल जप्त करण्यात आहे.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.